महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in, website: www.dteau.org

जा.क्र: विकाऔ/शिक्षण/२०२१/ 2041 दिनांक : 23 JUL 2021

प्रति,
**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानानित पदविका/
पदवी/पदयुत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्था,
**(औरंगाबाद विभाग.)**

**विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना अट क्र.३० च्या अनुषंगाने मुदतवाढ देण्याबाबत. (NBA/NAAC)**

**संदर्भ:- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन याचे पत्र क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/भाग-३/ तांशि-४, दिनांक २३ जून, २०२१..०८.२०२०**

**२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक :१८/तंशिसं/डीबीटी/वि.का.पत्र/२०२१, दिनांक ०६.०७.२०२१.**

उपरोक्त सदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ अखेरपर्यंत (**NAAC,NBA** इ.) मूल्यांकन/पुर्नमूल्यांकन व दर्जाचे मानांकन (**Assessment and Accreditation**) प्राप्त करुन घेणेसाठी पात्र ठरलेल्या संस्थांच्या बाबतीत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पर्यंत शिखर संस्थांकडे अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व त्यानंतर मूल्यांकन व दर्जाचे मानांकन प्राप्त (**Assessment and Accreditation**) करुन घेण्यासाठी पात्र ठरलेल्या संस्थांना त्या पुढील शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यंत संबंधित शिखर संस्थांकडे मानांकन प्राप्त करुन घेण्यासाठी अर्ज करणे बंधनकारक राहिल.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून संबंधित संस्थेतील अभ्यासक्रम या योजनेखालील शिष्यवृतीसाठी पात्र आहे किंवा अपात्र आहे याची माहिती प्रथम/थेट द्वितिय वर्षाच्या प्रवेशाच्या वेळी संबंधित विद्यार्थ्याला उपलब्ध होईल, विद्यार्थ्यांने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत प्रवेश घेतांना शिष्यवृत्तीसाठी अपात्र असलेल्या अभ्यासक्रमाची निवड केल्यास त्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या २३ जून-२०२१ च्या शासन पत्रातील मुदयांचे / सुचनांचे अवलोकन करुन, उचित कार्यवाही करावी.

सोबत : वरीलप्रमाणे.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.

प्रत :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

FIC

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय .महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६/८७ ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट:
http://www.dtemaharashtra.gov.in

स्पीड पोस्ट/ई-मेलद्वारे

क्रमांक : १८/तंशिसं/डीबीटी/वि.का.पत्र/२०२१/ २९५
दिनांक: ०६/०७/२०२१

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

**विषय:- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना अट क्र. ३० च्या अनुषंगाने मुदतवाढ देण्याबाबत.. (NBA/NAAC)**

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/भाग-३/तांशि-४, दि. २३ जून, २०२१.

उपरोक्त विषयासंबंधी शासनाकडून वरील संदर्भीय पत्र निर्गमित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या उच्च व्यावसायिक व तांत्रिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संस्थांना शासन पत्रातील अटींचे काटेकारपणे पालन करण्याबाबतच्या स्पष्ट सूचना देण्यात याव्यात. शासन पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

प्रत: १. मा. आयुक्त, राज्य सामाईक परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिअर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, मुंबई-४००००१ यांना विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेल्या संदर्भीय शासन पत्राच्या अनुषंगाने पुढील योग्य ती उचित कार्यवाही करण्यात यावी. (Email ID-maharashtra.cetcell@gmail.com)

२. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २, २अ, ३, १० व १९ मुख्य कार्यालय, मुंबई यांना संदर्भीय शासन पत्राच्या अनुषंगाने पुढील उचित कार्यवाही करण्यासाठी.

सर्व संस्थांना पत्र पाठवे.

(10)

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र ०२२-२२०४०९३५.                                        Email ID : sanjay.dharurkar@nic.in

क्रमांक: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/भाग-३/तांशि-४                                        दिनांक : २३जून,२०२१

पत्र प्राप्त झाले
23 JUN 2021
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१

प्रति,

१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय : राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना अट क्र.३० च्या अनुषंगाने मुदतवाढ देण्याबाबत...

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
दिनांक २९/६/२०२१

संदर्भ: १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-५, दि.७ ऑक्टोबर,२०१७

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२ (भाग-३)/तांशि-४, दि.७ ऑगस्ट,२०१८

३) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे क्र.१८/तंशिसं/ईबीसी/एनबीए/शा.प./२०२०/३९७, दि.१७ डिसेंबर,२०२० चे पत्र.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेकरीता निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.७ ऑक्टोबर, २०१७ मधील शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३३२ (भाग-३)/तांशि-४, दि.७/८/२०१८ अन्वये सुधारित केल्याप्रमाणे अट क्र.३० पुढीलप्रमाणे आहे:-

"२. सदर योजनेंतर्गत पात्र अभ्यासक्रम राबविण्याऱ्या सबंधित शैक्षणिक संस्था (NAAC,NBA इ.) मूल्यांकन/पुर्नमूल्यांकन करण्यास पात्र ठरल्यानंतर त्यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या अखेरपर्यंत सक्षम शिखर संस्था/यंत्रणा मंडळाकडून असे मूल्यांकन व दर्जाचे मानांकन प्राप्त (Assessment and Accreditation)करुन घेण्यासाठी शिखर संस्थांकडे/मंडळांकडे अर्ज करणे क्रमप्राप्त राहिल."

३. तथापि, या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठी या अटीची सक्ती शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पर्यंत करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत (NAAC, NBA इ.) मूल्यांकन /पुर्नमुल्यांकन व दर्जाचे मानांकन (Assessment and Accreditation) प्राप्त करुन घेणेसाठी पात्र ठरलेल्या संस्थांच्याबाबतीत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पर्यंत शिखर संस्थांकडे अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

४. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व त्यानंतर मूल्यांकन व दर्जाचे मानांकन (Assessment and Accreditation) प्राप्त करुन घेण्यासाठी पात्र ठरलेल्या संस्थांना त्या पुढील शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यंत संबंधित शिखर संस्थांकडे मानांकन प्राप्त करुन घेण्यासाठी अर्ज करणे बंधनकारक राहिल.

५. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून संबंधित संस्थेतील अभ्यासक्रम या योजनेखालील शिष्यवृत्तीसाठी पात्र आहे किंवा अपात्र आहे याची माहिती प्रथम / थेट व्दितीय वर्गाच्या प्रवेशाच्या वेळी संबंधित विद्यार्थ्याला उपलब्ध होईल, या दृष्टीने सर्व संबंधितांनी नियोजन करावे. विद्यार्थ्याने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत प्रवेश घेताना शिष्यवृत्तीसाठी अपात्र असलेतर अभ्यासक्रमाची निवड केल्यास त्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नसल्याचा स्पष्ट संदेश देण्यात यावा.

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

अमुस / प्र.स./सचिव,

१. कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,९ वा मजला, प्रशासकीय इमारत, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४. आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. इतर मागास व बहुजन कल्याण विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. निवड नस्ती